# बृहन्मुंबई महानगरपालिका

कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष कर्करोग आणि
बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरिवली (पू.)
(लो.टि.म. वैद्यकिय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई यांचे उपकेंद्र)

क्र. एलटीएच/ 877 /सीटीसी,
दि. 13 / 02 /2026

**विषय:** मनपा- कॉम्प्रिहेन्सीव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र येथील "अति विशेष सेवा, सुविधा व उपचार" केंद्रासाठी कंत्राटी तत्वावर **डॉक्टर्स व निमवैद्यकीय कर्मचारी** संवर्गातील सद्यस्थितीत रिक्त झालेली कंत्राटी पदे जाहिरातीद्वारे निवड समितीच्या मार्फत मुलाखत घेऊन कंत्राटी तत्वावर भरण्याबाबत सुधारित प्रस्ताव.

**संदर्भ:** 1) मा. महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी क्र. एमजीसी/एफ/ 2176 दि.09.01.2017 (पृ. क्र. सी - 39)

2) मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी अन्वये निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक क्र. उपआयुक्त /सा.आ/ ओडी/ 369 दि.20.12.2023 (पृ.क्र. सी-149 ते सी- 155)

3) मा. महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी क्र. एमजीसी/एफ/ 6978 दि. 19.09.2025 (पृ. क्र. सी - 121 ते सी- 127)

4) मा. महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी क्र. एमजीसी/एफ/ 5292 दि. 13.01.2025 (पृ. क्र. सी - 1 ते सी - 37)

5) मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प.उप.) यांचे अभिप्राय क्र. अति. आयुक्त/प. उप./4223/डी दि.24.09.2025 (पृ.क्र. सी - 135 ते सी - 139)

6) मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प.उप.) यांना सादर केलेले अहवाल क्र. AMC/ WS / 5342 / D दि.25.11.2024 (पृ.क्र. सी - 129 ते सी - 133)

7) मा. अधिष्ठाता (लोटिमस रुग्णालय) यांच्या सोबत दि. 18.12.2025 रोजी यांच्या दालनात झालेली चर्चा.

मा. अधिष्ठाता (लोटिमस रुग्णालय) यांच्या दालनात दि. 18.12.2025 रोजी झालेल्या चर्चेच्या अनुशंगाने सुधारित प्रस्ताव सादर करीत आहोत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील बोरिवली (पू) येथील सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र उभारण्यासाठी मा.महानगरपालिका आयुक्त यांनी क्र. एमजीसी/एफ/ 6978 दि. 19.09.2025 (पृ. क्र. सी- 121 ते सी- 127) अन्वये मंजुरी दिली आहे. सदर केंद्राचा दि. 17.04.2017 पासून पूर्णपणे कार्यान्वित झाले आहे.

सदर अति विशेष सेवा, सुविधा व उपचार" केंद्रासाठी कंत्राटी तत्वावर निर्माण करण्यात आलेल्या पदांचे पदसातत्य राखण्याकरीता प्रशासकिय मंजुरी प्राप्त करण्यात आली असून अंतिमत: दि. 02.12.2024 ते दि. 30.11.2026 या 2 वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात सदर पदांचे पदसातत्य राखण्यास मा. महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी संदर्भ क्र. एमजीसी/एफ/ 5292 दि.13.01.2025 (पृ. क्र. सी - 1 ते सी - 37) अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदर केंद्राचा कार्यभार सोबत पृ.क्र. सी- 63 ते सी- 65 वर जोडण्यात आला असुन रिक्त पदांची कर्तव्यसुची पृ.क्र सी-81 ते सी-83,सी-147, सी- 169 व सी-173 वर लावण्यात आली आहे.

मा. महागरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी अन्वये (पृ. क्र. सी - 1 ते सी - 10) पदसातत्य राखण्याकरिता मंजुरी प्राप्त झालेल्या 140 कंत्राटी तत्वावरील पदांचा संक्षिप्त तक्ता सी - 11 वर लावण्यात आलेला आहे. त्यापैकी पृ.क्र. एन-1 ते एन-5 वर नमुद केल्यानुसार वेगवेगळ्या संवर्गातील पदे पदधारकांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त होती. त्याअनुशंगाने पदे भरण्याकरीताचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर केंद्रातील खालील अन-अनुसुचीवरील निर्माण करण्यात आलेल्या एकुण 25 पदांपैकी 15 पदांचे पदसातत्य राखण्याच्या प्रस्तावावर मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प.उप.) यांच्याकडुन मा. अधिष्ठाता (लोटिमस रुग्णालय) यांना प्राप्त झालेल्या निर्देशान्वये सद्यस्थितीत रिक्त असणारी कंत्राटी तत्वावरील पदे तात्काळ अस्थगित ठेवण्याकरीता संदर्भ क्र. AMC/ WS / 5342 / D दि. 25.11.2024 (पृ.क्र. सी - 129 ते सी - 133) अन्वये निर्देशित करण्यात आली होती. त्याअनुशंगाने पुर्वीच्या प्रस्तावात नमुद केलेली पृ.क्र. एन-1 वरील तक्ता क्र. 1 वरील अनु.क्र. 1 ते 2 व अनु. 4 ते 8(ब) पर्यंतची एकुण पदे अस्थगित ठेवण्याकरीता प्रस्तावितेले आहे. त्यामधील अनु. क्र. 3 वरील विकृतीशास्त्र हे पद रुग्णालयाच्या अंतर्गत अहोरात्र प्रयोगशाळा, रक्त संचयन केंद्र व गॅमा इरॅडिएशन यांच्या सुरळीत व्यवस्थापनाकरीता आवश्यक असल्यामुळे हे पद अस्थगित न ठेवता पुढे चालु ठेवण्याकरीता यापुर्वी संदर्भित प्रस्तावामध्ये अबाधित राखण्यात आले आहे.सदर केंद्रातील खालील तक्त्यात नमूद केलेले पद रिक्त असून त्यांचा तपशील खालीलप्रमाणे-

**तक्ता क्र.** 1

| अ.क्र. | कंत्राटी तत्वावरील पदाचे नाव | ठोस वेतन दरमहा (रू.) | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | विकृतीशास्त्रज्ञ (पूर्णवेळ) | 1,12,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकाने राजीनामा दिल्यामुळे पद रिक्त (पृ.क्र. सी- 89) |
| 2 | क्ष-किरण तंत्रज्ञ | 20,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकाने राजीनामा दिल्यामुळे पद रिक्त (पृ.क्र. सी- 145) |
| 3 | माहिती तंत्रज्ञ | 33,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकाने राजीनामा दिल्यामुळे पद रिक्त (पृ.क्र. सी- 167) |
| 4 | अफेरेसिस टेक्निशियन | 22,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकाने राजीनामा दिल्यामुळे पद रिक्त (पृ.क्र. सी- 171) |
| | | | | **एकूण पदे** | 04 | |

सदर कंत्राटी तत्वावरील पदाचे पदसातत्य राखण्याकरीता मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजूरी संदर्भ क्र.एमजीसी/एफ/5292 दि. 13.01.2025 (पृ.क्र. सी- 1 ते सी-37) अन्वये पदसातत्य वैधता कालावधी दि. 30.11.2026 पर्यंत राखण्याकरीता मंजूरी अन्वये सदर पद जाहिरात, मुलाखतीद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकरीता प्रस्ताविण्यात आले आहे. तरी सदर पदाची पूर्वीची मान्यता प्राप्त अर्हता खालीलप्रमाणे-

**तक्ता क्र.** 2

| अ. क्र. | कंत्राटी तत्वावरील पदाचे नाव | अर्हता | वयोमर्यादा (कमाल वर्ष) | पद संख्या | ठोक वेतन दरमहा (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | विकृतीशास्त्रज्ञ (पूर्णवेळ) | एमडी/ डीएनबी (पॅथोलॉजी) किंवा एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी | 50 वर्ष | 1 | 1,12,000/- |
| 2 | क्ष-किरण तंत्रज्ञ | 1. उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापीठामार्फत चालविला जाणारा क्ष-किरण विषयातील बी. पी. एम. टी. (Bachelor in Paramedical Technology in Radiology) हा पूर्णवेळ 3 वर्षाचा पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने 6 महिन्याचे इंटर्नशीप पूर्ण केलेली असावी. | 38 वर्ष | 1 | 20,000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2. उमेदवार मान्यताप्राप्त विदयापीठाची विज्ञान शाखेची भौतिकशास्त्र या मुख्य विषयासह पदवी परीक्षा (B.Sc. In Physics) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टिक सेंटर / रुग्णालय येथील क्ष-किरण विषयक कामाचा 2 वर्षाचा अनुभव असावा.<br>किंवा<br>3. उमेदवार हा 12 वी नंतर मान्यताप्राप्त संस्थेकडुन / विद्यापीठातुन रेडीओग्राफी ही पदविका (Diploma in Radiography) उत्तीर्ण असावा व डायग्नोस्टिक सेंटर / रुग्णालय येथील क्ष-किरण विषयक कामाचा 2 वर्षाचा अनुभव असावा. | | | |
| 3 | माहिती तंत्रज्ञ | बीएससी परीक्षेत माहिती तंत्रज्ञ विषय घेऊन उत्तीर्ण होणे आवश्यक किंवा<br>माहिती तंत्रज्ञामध्ये डिप्लोमा आणि या क्षेत्रातील हॉस्पीटल मधील 1 वर्ष काम केलेल्याचा अनुभव.<br>तसेच सीसीएनए आणि एमसीएसइ प्रमाणपत्र असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल. | 38 वर्ष | 1 | 33,000/- |
| 4 | अफेरेसिस टेक्निशियन | बी.एससी डीएमएलटी, एफडीए मान्यताप्राप्त तंत्रज्ञ प्रमाणपत्र अनिवार्य.<br>अफेरेसिसच्या मधील अनुभवास प्राधान्य दिले जाईल. | 38 वर्ष | 1 | 22,000/- |

विशेष टिप- अनु क्र. 2 व 4 वरील पदाकरीता विभागामार्फत व्यावसायिक चाचणी (Trade Test) घेण्यात येईल. तसेच सदर पदाकरीता MSCIT असणे आवश्यक.

सदर रिक्त असलेले पद या सेंटरमधील "अति विशेष रुग्णसेवा, सुविधा व उपचार" केंद्राचे कामकाज सुरळीत चालू राहण्याकरीता भरणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे **मा. अधिष्ठाता (लोटिमस) / मा. संचालक (वै.शि.व प्र.रु)** यांनी खालील बाबींस कृपया मंजूरी द्यावी.

1. सदर प्रस्तावात नमुद केलेले तात्पुरत्या स्वरुपातील कंत्राटी तत्वावरील रिक्त पद भरण्यासाठी 03 स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन व रुग्णालयाच्या सुचना फलकावर जाहीरात प्रदर्शित करण्यास तसेच पृष्ठ क्र. एन- 17 वरील जाहिरात व अर्जाचा नमुना व अटी आणि शर्ती (पृ. क्र.सी - 157 ते सी - 165) हे मनपाच्या **http://www.mcgm.gov.in**, तसेच मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्राच्या **http://www.ctcphobmt.com** व लोटिमस रुग्णालयाच्या **http://www.ltmgh.com** या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यास.

2. सदर प्रस्तावित 03 स्थानिक भाषेतील वृत्तपत्रातील जाहिरातीचा खर्च जनसंपर्क विभागाच्या योग्य त्या अर्थसंकल्पिय लेखाशिर्षातुन भागविण्यास.

3. मनपाच्या **http://www.mcgm.gov.in** तसेच मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्राच्या **http://www.ctcphobmt.com** व लोटिमस रुग्णालयाच्या **http://www.ltmgh.com** या संकेत स्थळावर जाहिराती सोबत विहित नमुन्यात उपलब्ध असणारा अर्ज इच्छुक उमेदवारांकडून सर्व आवश्यक प्रमाणपत्र व अर्ज शुल्कासहीत (सुधारीत अर्ज शुल्क संदर्भ: सार्वजनिक आरोग्य खाते परिपत्रक, एचओ/पी/30319/लेखा दि. 10.03.2025 (पृ.क्र.सी - 61) नुसार स्विकारुन, अर्जांची छाननी व पडताळणी केल्यानंतर, मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची यादी मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्राच्या **http://www.ctcphobmt.com** या संकेत स्थळावर जाहीर करुन पात्र उमेदवारांची मुलाखत **मा.महानगरपालिका आयुक्त** यांच्या मंजुरी क्र. एमजीसी/एफ/1271 दि. 28.11.2023 अन्वये **संघटीत** करुन **स्थापित** केलेल्या **निवड समिती** मार्फत मुलाखतीतील गुणवत्ते अन्वये निवड करण्यास.

4. सदर पदांकरीता पृ. क्र. एन- 14 वरील तक्ता क्र. 1 व तक्ता क्र.2 मध्ये प्रशासकीय मंजुरी अन्वये नमुद केलेले ठोस वेतन मनपा - सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र, बोरीवली (पु) च्या निधी केंद्र संकेतांक 1000625188 च्या अर्थसंकल्पीय लेखा शिर्षक 220800400 च्या उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतुदी मधून भागविण्याकरीता.

5. सदर पदांच्या कंत्राटाचा कालावधी 10 महिन्यांकरीता असेल (दि.30.11.2026 पर्यंत) व दर 6 महिन्यांनी एक दिवसाचा तांत्रिक सेवा खंड देऊन पुन:र्नियुक्ती करण्यास.

6. अनु क्र. 2 व 4 वरील पदाकरीता विभागाअंतर्गत व्यावसायिक चाचणी (Trade Test) घेण्याकरीता.

7. कंत्राटी तत्वावरील निवडण्यात आलेली उमेदवारांची **प्रतिक्षा यादी पुढील 6 महिन्यांकरीता** ग्राहय धरण्यास.

8. सदर नमूद पदांवर नेमणूक होणाऱ्या उमेदवारांकडून सदर कंत्राटीच्या सहा महिन्यांच्या नेमणूकीच्या कालावधीकरीता उप कायदा अधिकारी (औद्योगीक व कामगार न्यायालय) संदर्भ क्र. LOP/44/MC दि. 08.01.2017 च्या कंत्राटी नेमणूकीच्या अटी व शर्ती यांच्या आधीन राहून अभिप्राया अन्वये कोर्ट स्टॅम्पवर **"प्रतिज्ञापत्रा सह हमीपत्र" रितसर 'नोट्रीसह'** करारनामा लिहून घेण्यासापेक्ष नेमणूक करण्यास.

9. पात्र उमेदवारांकरीता मुलाखतीची दिनांक व वेळ संकेतस्थळावर प्रदर्शित करुन सर्व पात्र उमेदवारांची मुलाखत मनपा- कॉम्प्रिहेन्सीव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पू), मुंबई - 400066 येथे घेण्याकरीता.

सविनय सादर.

10.02.2026

**डॉ. संतोष खुडे**
**उप संचालक,**
**मनपा - सीटीसी, पीएचओ**
**आणि बीएमटी केंद्र.**

13/02/2026

**डॉ. रत्ना शर्मा**
**संचालक,**
**मनपा - सीटीसी, पीएचओ**
**आणि बीएमटी केंद्र.**

**डॉ. प्रमोद इंगळे** 14 FEB 2026
**मा. अधिष्ठाता**
**(लोटिमस रुग्णालय)**

DEAN
Lokmanya Tilak Municipal General
Hospital & Medical College,
Sion, Mumbai - 400 022.

No. Director/M.E.& M.H./ 5664
17/02/2026

**डॉ. शैलेश मोहिते**
**मा. संचालक (वै.शि. व प्र.रु)**

यथा प्रस्तावित मंजूर

17/2/26.

Director (M.E.&M.H.)

संचालक (वै.शि.व प्र.रु.)

16 FEB 2026

आवक क्रमांक: 5664
दिनांक:

प्रती धारिकेत.

N-17

# बृहन्मुंबई महानगरपालिका

कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि
बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरिवली (पू.)
(लो.टि.म. वैद्यकिय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई यांचे उपकेंद्र)

क्र. एलटीएच/ /सीटीसी दि.

## जाहिरात

मनपा - कॉम्प्रिहेन्सीव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पू) येथील अति विशेष सेवा, सुविधा व उपचार केंद्राकरीता खालील नमूद केलेली पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी दि. 30.11.2026पर्यंतच्या कालावधीकरीता दर 6 महिन्यांनी एक दिवस तांत्रिक सेवा खंड सापेक्ष भरावयाचे आहे.

विहीत नमुन्यातील अर्ज मनपाच्या http://www.mcgm.gov.in तसेच या रुग्णालयाच्या http://www.ctcphobmt.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुक उमेदवारांनी पदासाठी रू. 790 + 18% GST इतके अर्ज शुल्क आणि सर्व बाबींची पूर्तता केलेले अर्ज, सर्व प्रमाणपत्रांच्या स्वंय साक्षांकीत छायांकित प्रती, अलीकडेच काढलेले पासपोर्ट छायाचित्र त्यावर चिकटवुन मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू), मुंबई - 400066 येथे दि. / /2026 ते दि. / /2026 पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) स.10.00 ते दु. 01.00 पर्यंत भरुन द्यावे. अपूर्ण अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

| अ. क्र. | कंत्राटी तत्वावरील पदाचे नाव | अर्हता | वयोमर्यादा (कमाल वर्ष) | पद संख्या | ठोक वेतन दरमहा (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | विकृतीशास्त्रज्ञ (पूर्णवेळ) | एमडी/ डीएनबी (पॅथोलॉजी) किंवा एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी | 50 वर्ष | 1 | 1,12,000/- |
| 2 | क्ष-किरण तंत्रज्ञ | 1. उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा क्ष-किरण विषयातील बी. पी. एम. टी. (Bachelor in Paramedical Technology in Radiology) हा पूर्णवेळ 3 वर्षाचा पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने 6 महिन्याचे इंटर्नशीप पूर्ण केलेली असावी.<br>2. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची भौतिकशास्त्र या मुख्य विषयासह पदवी परीक्षा (B.Sc. In Physics) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टिक सेंटर / रुग्णालय येथील क्ष-किरण विषयक कामाचा 2 वर्षाचा अनुभव असावा.<br>किंवा<br>3. उमेदवार हा 12 वी नंतर मान्यताप्राप्त संस्थेकडुन / विद्यापीठातुन रेडीओग्राफी ही पदविका (Diploma in Radiography) उत्तीर्ण असावा व डायग्नोस्टिक सेंटर / रुग्णालय येथल क्ष-किरण विषयक कामाचा 2 वर्षाचा अनुभव असावा. | 38 वर्ष | 1 | 20,000/- |
| 3 | माहिती तंत्रज्ञ | बीएससी परीक्षेत माहिती तंत्रज्ञ विषय घेऊन उत्तीर्ण होणे आवश्यक किंवा<br>माहिती तंत्रज्ञामध्ये डिप्लोमा आणि या क्षेत्रातील हॉस्पीटल मधील 1 वर्ष काम केलेल्याचा अनुभव.<br>तसेच सीसीएनए आणि एमसीएसइ प्रमाणपत्र असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल. | 38 वर्ष | 1 | 33,000/- |
| 4 | अफेरेसिस टेक्निशियन | बी.एससी डीएमएलटी, एफडीए मान्यताप्राप्त तंत्रज्ञ प्रमाणपत्र अनिवार्य.<br>अफेरेसिसच्या मधील अनुभवास प्राधान्य दिले जाईल. | 38 वर्ष | 1 | 22,000/- |

टिप – अनु क्र. 2 व 4 वरील पदाकरीता विभागामार्फत व्यावसायिक चाचणी (Trade Test) घेण्यात येईल. तसेच सदर पदाकरीता MSCIT असणे आवश्यक.

**सर्वसाधारण अटी व शर्ती-**

सर्वसाधारण अटी व शर्ती मनपाच्या http://www.mcgm.gov.in व मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू) केंद्राच्या https://www.ctcphobmt.com संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

**विशेष सुचना:**

1) सदर निवड प्रकिया कुठल्याही वेळी स्थगित करण्याचे अधिकार हे मा. महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

2) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

3) टपालाने / कुरिअरने /ई-मेलद्वारे आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

4) पात्र उमेदवारांच्या मुलाखती संबंधी ठिकाण, दिनांक व वेळ मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू) केंद्राच्या https://www.ctcphobmt.com संकेतस्थळावर देण्यात येईल.

10.02.2026
**डॉ. संतोष खुडे**
**उप संचालक,**
**मनपा - सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र**

13/02/2026
**डॉ. रत्ना शर्मा**
**संचालक,**
**मनपा - सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र**

**डॉ. प्रमोद इंगळे**
**अधिष्ठाता**
**लो.टि.म.स. रुग्णालय**

17/2/26
**डॉ. शैलेश मोहिते**
**संचालक (वै.शि.व प्र.रु)**
Director (M.E.&M.H.)

14 FEB 2026
DEAN
Lokmanya Tilak Municipal General